**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ५७९/२०२२**

**अपिलार्थी, श्री. विनोद गिरिजाशंकर पाली,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सा.बा.वि.),**
नेहरुनगर झोन क्र.५, महानगर पालिका, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त,**
नेहरुनगर झोन क्र.५, महानगर पालिका, नागपूर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.०१.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१०.२०२१ | ११.११.२०२१ | २४.११.२०२१ | ०७.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २८.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "चार माह, जून २०२० से ऑक्टोबर २०२०, निचे दिये गये ग्रेव्हेन्स डिटेल्स की कारवाई व लोगो, नागरिको को जारी की गयी नोटीस प्रति हमको प्रदान करे, पिछले चार भी मांगे की किंतू नही दिये, ग्रेव्हेन्स निम्न प्रकार है, 1) 5-9-2020 -24314 dt. 19.09.20220 2) 5-8-2020 – 19627 dt. 06.08.2020 3) 5-7-2020-14013 dt. 11.07.2020 4) 5-7-2020- 13048 dt. 06.07.2020 अब तक के हमारे ग्रेव्हेन्स के अगेन्स्ट हमे सारे दस्तावेज देने की कृपा करे," याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (लोककर्म विभाग) यांनी दिनांक ११.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविले की, आपण मागितलेली माहिती ही ऑन लाईन ग्रिव्हीअन्स ॲपवर दाखल तक्रारी संदर्भात असल्याचे दिसून येते. तक्रारी संदर्भाने केलेल्या कार्यवाहीबाबत याच ॲपवर आपणांस माहिती प्राप्त करता येईल. तथापि आपणास सदर प्रकरणाबाबत आणखी इतर माहिती हवी असल्यास संबंधित नस्तीचे कार्यालयीन वेळेत येवून

आपण निरीक्षण करावे व आपणास आवश्यक असलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी. त्या अपिलार्थी यांनी **दिनांक २४.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांनी कायदयाचा गैरवापर करुन माहिती लपविली, जोडपत्र अ प्रमाणे माहिती अपूर्ण दिली" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून आदेशात श्री. गिरीश लिखार, उप अभियंता तथा माहिती अधिकारी नेहरुनगर झोन क्र.५ महानगरपालिका नागपूर यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस निरीक्षणाकरीता संबंधित नस्ती उपलब्ध करुन दयावी व आवश्यक असलेली माहिती सशुल्क पुरविण्यात यावी, असे आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०३.२०२२ रोजी** "१) अपुर्ण जवाब मिला है, २) पूर्ण नोटिसची प्रती व म.न.पा. पोलीस (N.D.S.) ची नोटीस प्रति माह चार वर्षाची नाही मिळाली," असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १७.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सा.बा. वि.) श्री. गिरीश लिखार उपस्थीत आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त श्री. अशोक पाटील उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपीलार्थी श्री. पाली यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता नागपूर यांनी दिनांक ११.११.२०२१ रोजी अपीलार्थीस विहीत मुदतीत माहितीबाबत कळविले आहे. मात्र अपीलार्थी यांनी व्यथित होवून प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले, त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाबाबत आणखी इतर माहिती हवी असल्यास संबंधित नस्तीचे कार्यालयीन वेळेत येवून निरीक्षण करावे व आवश्यक असलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे आदेशीत केले. त्यानुषंगाने अपीलार्थीस त्याच दिवशी आवश्यक असलेली ७ पाने सशुल्क प्रदान करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांचेकडे दिनांक २२.०१.२०२१ रोजी याचविषयावर याआधी देखील माहिती अर्ज दाखल करुन त्यांनी आठ माह अगोदर दिलेल्या कम्पलेंन्टवर आजपर्यंत का बर नाही झाली कारवाई, अजून किती वेळ लागणार तसेच नागपूर लाईव्ह सिटी पोर्टलवर चार ग्रेव्हेंन्स होती त्यावर लोकांना पाठविलेली नोटीसची सर्व प्रती पाहिजे, अशी माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.०१.२०२१ रोजी अपीलार्थीस अपेक्षिलेली माहिती ही प्रश्नार्थक व विस्तृत स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अंतर्गत माहिती देणे बंधनकारक नाही. तथापि विचारलेल्या माहिती संबंधाने असलेली नस्ती पुढील कार्यवाहीस्तव दिनांक ०७.१२.२०२० रोजी अतिक्रमण विभागास पाठविण्यात आलेली असून सदर नस्ती कार्यालयात परत प्राप्त झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल, तदनंतर आपण कार्यालयीन वेळेत नस्तीचे निरीक्षण करुन



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

आवश्यक असलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे कळविले. मात्र तदनंतर अपीलार्थी यांनी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी आयोगात माहिती अपुर्ण मिळाली असून पूर्ण नोटिसची प्रती व म.न.पा. पोलीस (N.D.S.) ची नोटीस प्रति माह चार वर्षाची माहिती मिळाली नसल्याचे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले.

आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांनी म.न.पा. कडून अपूर्ण माहिती मिळाली असून N.D.S. द्वारे अदा केलेल्या कार्यवाहीचा तपशील मिळाला नसल्याचे देखील नमूद करण्यात आले आहे. म.न.पा. च्या वतीने ऑन लाईन ग्रिव्हीअन्स ॲपवर दाखल केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा तपशील त्यात प्राप्त झालेल्या उपलब्ध कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात येतात, त्यातील अपीलार्थी यांनी नमूद केलेल्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने N.D.S. च्या वतीने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील अभिलेख स्वरुपात उपलब्ध असल्यास अपीलार्थीस विनामुल्य देण्यात यावा, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.०१.२०२३**

जावक क्रमांक 2567 दिनांक 25 APR 2023